नि. फौ.ख.क्रं. २३०/२०२४
शासन वि. राजेंद्र
नि.क्र. ५७/क

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०१ यांची शपथेवर जबानी</u>**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | रुपाली बाळासाहेब मदने |
| वय | : | ४१ वर्षे |
| व्यवसाय | : | शेती |
| राहणार | : | शिराळ, ता. आष्टी जि. बीड |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. व्ही.एम. दारुणकर यांचेमार्फत</u>**

१. घटना दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास घरासमोर असतांना घडली. आरोपी क्र. १ व २ यांनी जुन्या भांडणाचे कारण काढुन शिवीगाळ केली. आरोपी क्र. १ याने मला उजव्या गालावरती दगडाने मारले. मी आरडाओरडा केल्यानंतर पती बाळासाहेब व मुलगा तुषार तेथे आले. माझ्या पतीने आरोपी क्र. १ यास का मारले असे विचारले असता, आरोपी क्र. १ माझ्या पतीस तुला जास्त झाले काय असे म्हणाला. आरोपी क्र. १ ने त्यानंतर मुलगा तुषार यास उजव्या डोळ्याच्या वर दगडाने मारले. आरोपी क्र. ३ ते ६ तेथे येऊन जबरदस्तीने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. आरोपी क्र. १ व ६ यांनी जीवे मारण्याची धमकी दिली. शेजारच्या लोकांनी येऊन भांडणे सोडवली. घटनेमध्ये मला डोक्यात पाठीत, पतीला व मुलगा तुषारला मार लागला.

०२. त्यानंतर आम्ही कडा येथे पोलीस स्टेशनला गेलो. त्यांनी दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिले. सदरचे पत्राची कार्बन कॉपी साक्षीदारास दाखवण्यात आली. ते पत्र तेच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पत्रास **नि.पी.५८/पी.डब्ल्यु. १** देण्यात येते. त्यानंतर कडा येथे सरकारी दवाखान्यात गेलो. तेथे उजव्या गालावर ३ टाके घेतले. तुषारच्या डोळ्याला पट्टी केली व गोळ्या औषधे घेतली. पतीने देखील उपचार घेतले. परत आम्ही पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. फिर्याद दाखवल्यास ओळखु शकते. आता मला जबाब/फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यावर माझा अंगठा आहे. फिर्यादीस **नि.पी-५९/पीडब्ल्यु-१** देण्यात येते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पोलीस पंचनाम्यासाठी आले. तेथे पोलीसांनी पंच सतीष मदने, अशोक श्रीराम यांच्यासमक्ष पंचनामा केला व पोलीसांनी दगड जप्त केला.

०३. मला आरोपींनी ज्या दगडाने मारले ते पाहिल्यास मी ओळखु शकते. साक्षीदारास जी.एम.पी. नंबर ३२/२०२५ वरील मुद्येमाल ओबड-धोबड दगड दाखवण्यात आला. साक्षीदाराने मुद्येमाल तोच असल्याचे ओळखले. दगडास अनुक्रमे **एम.ओ. १** देण्यात येते. आरोपीस पाहिल्यास मी ओळखु

शकते. आरोपी क्र. १ ते ३, ५ व ६ न्यायालयात हजर आहेत. **नि. ६०** वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र. ४ आरोपी यांची ओळख न नाकारण्याच्या अटीसह हजेरीमाफी मंजुर.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही.एच. शेकडे यांच्यातर्फे उलटतपास सुरु.**

०४. अंदाजे २० वर्षापुर्वी माझा विवाह झाला. लग्नापासुन सर्व आरोपींना ओळखते. सर्व आरोपी भावकीतील आहेत. माझे सासरे आप्पासाहेब मदने यांना इतर ३ भाऊ, आरोपी क्र. ३ पन्नालाल, रावसाहेब व सोनाजी आहेत. आरोपी क्र. ३ यांना आरोपी क्र. १ राजेंद्र मुलगा व ४ पत्नी, आरोपी क्र. २ सुन आहे. दुसरे सासऱे सोनाजी यांना आरोपी क्र. ५ विलास व आरोपी क्र. ६ शांतीलाल असे २ मुले आहेत. सासऱ्यांच्या जमीनीचे आप-आपसात वाटत झालेबाबत सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्वजण आप-आपली जमीनी वहिती करतात. चोभा निमगाव येथील तलाव आमच्या व आरोपींच्या जमीनीतुन गेलेबाबत माहिती नाही. परंतु सासरे आप्पासाहेब यांच्या जमीनीतुन तलाव गेला आहे. आरोपीसोबत आमचे पाटाच्या मोबदलच्या पैशावरुन भांडणे होतात. पाटामध्ये जमीन गेलेबाबत केस चालु असलेबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पाटाखाली गेलेली जमीन आरोपी क्र. ३ पन्नालाल वगळता इतर सासऱ्यांनी शहाजी आजबे यांच्याकडुन विकत घेतली आहे. अमान्य की, आरोपी क्र. ३ यांचा देखील त्या जमीनीमध्ये हिस्सा आहे.

**मध्यान्हाची वेळ झाल्याने उर्वरित उलटतपास दुपारपर्यंत तहकुब.**

दि.०५.०२.२०२६ श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.02.06 11:14:54 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी

**दुपारनंतर उर्वरित उलटतास आरोपीतर्फे व्ही.एच. शेकडे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

०५. पाटामध्ये गेलेल्या जमीनीमध्ये सर्व सासऱ्यांचा हिस्सा असलेबाबत सांगता येत नाही. घटनेच्या वेळी माझ्याकडे मोबाईल नव्हता. फिर्याद देतेवेळी मी पतींचा नंबर ९७६३२९८५२३ सांगितला. या व्यतिरिक्त दुसरा नंबर सांगितलेबाबत सांगता येत नाही. फिर्यादमध्ये नमुद ८३२९६४०४०४ हा नंबर कोणाचा आहे याबाबत सांगता येत नाही. सदर नंबर मी पोलीसांना सांगितला नाही. पोलीसांना फिर्याद देतेवेळी मी आरोपीसोबत किरकोळ भांडणे असल्याचे सांगितले होते. आरोपींनी पुर्वी मला व पतीस मारहाण केली होती. आरोपीसोबत ९ वर्षापुर्वी पासुन वाद आहेत. आरोपी क्र. १ माझी छेड काढतात त्यामुळे आमचे वाद होतात. त्याबाबत मी आरोपींवर गुन्हा दाखल केला होता. त्याचा गुन्हा रजिस्टर क्रमांक सांगता येत नाही. केस प्रलंबित असलेबाबत सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचा आरोपींवर राग आहे. घटनेच्या १-२ दिवसापुर्वी आरोपींशी काही झाले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्यावेळी आरोपी व आमच्या घरामध्ये केवळ भिंत होती. हे म्हणणे खरे आहे की, दोघांचे घराचे दरवाज्याचे तोंड एकाच बाजुला आहेत. आमची वस्ती

शिराळ पासुन २ कि.मी. अंतरावर असुन हनुमंतगाव ते शिराळ रस्त्यालगत आहे. आमच्या वस्तीवर २० घरे आहेत. आरोपी आमच्या उत्तर बाजुला राहतात व त्यांच्या उत्तरेस धोंडिबा मदने, सोनाजी मदने यांची घरे आहेत.

०६. घटनेच्यावेळी सकाळी मी ५.४५ वाजता मी घराबाहेर पडले. त्यावेळी आरोपींच्या घरासमोर आरोपी क्र. १ ते ६ होते. माझे सासरे आप्पासाहेब मदने हे मेंढरे सोडुन दुसऱ्याच्या अंगणात बसण्यासाठी गेले होते. त्यांना घटनेबाबत काही माहिती नव्हते. मुलगा तुषार व पती बाळासाहेब त्यावेळी झोपलेला होता. साक्षीदार दीर संजय मदने त्यांच्या कुटुंबासह आमच्या घरापासुन १००-१५० मीटर अंतरावर त्यांच्या स्वतंत्र घरात राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही त्यावेळी नियमीतपणे भेटत होतो व बघत होतो. घटनेबाबत गावांमध्ये कोणाला काही सांगितले नाही. घटनेनंतर ६.३० वाजता घरातुन निघालो. माझ्यासोबत पती बाळासाहेब व मुलगा तुषार होता. शिराळ ते कडा १२ कि.मी. अंतर आहे, कड्याला जाण्यासाठी अंदाजे ३० मिनीटे लागतात. शिराळपासुन आष्टी १०-१२ कि.मी. अंतरावर आहे. प्रथमतः आम्ही कडा पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी कोण कोण जखमी झाले हे सांगितले होते. तुषार जखमी झाल्याचे सांगितले होते. मुलगा तुषारला दवाखान्याचे पत्र दिलेबाबत सांगता येत नाही. अमान्य की, पोलीसांना केवळ मुक्कामार लागलेबाबत सांगितले होते. आमच्याकडे पल्सर गाडी आहे. आज देखील त्या गाडीने आलो.

०७. आरोपींनी आमच्या विरुध्द खटला क्र. २४५/२०२४ दाखल केलेबाबत सांगता येत नाही. अमान्य की, दि. ०३/१२/२०२३ रोजी आरोपी घरी असतांना त्यांच्या घरासमोर गेलो व त्यांना शिवीगाळ केली, आरोपी क्र. १ व २ यांनी आम्हाला समजावण्याचा प्रयत्न केला. अमान्य की, तेव्हा माझ्या पतीने आरोपी क्र. १ च्या डोक्यात दगड मारला. अमान्य की, मी आरोपी क्र. २ ला दगडाने डोक्यात मारले. अमान्य की, मुलगा तुषारने लोखंडी फावड्याच्या दांड्याने आरोपींना मारले. अमान्य की, दीर संजय, सासरे आप्पासाहेब, सासु चंदुबाई यांनी आरोपींना खाली पाडुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे आरोपी क्र. २ हिने आमच्याविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार केलेबाबत सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी आमच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

०८. आमच्या गावात राजकीय दोन गट असलेबाबत माहिती नाही. आमदार बाळासाहेब आजबे यांचा गट माहिती आहे. त्याच्या विरुध्द गट असलेबाबत माहिती नाही. माझे पती आजबे यांच्या गटातील आहेत. अमान्य की, माझ्या पतीचा पोलीस स्टेशनला व दवाखान्यात प्रभाव आहे. अमान्य की, आरोपींनी मारहाण केली नाही त्यामुळे मला जखमा झाल्या नाहीत. अमान्य की, आम्ही मोटारसायकल जातांना पडलो त्यामुळे जखमा झाल्या. घटनेदिवशी कड्याला मोटारसायकलने

आलो. घटनेदिवशी पोलीस स्टेशनला ७.१५ वाजता पोहचल्यानंतर तेथे ३० मिनीटे थांबलो. तेथुन दवाखान्यात ८.००-८.१५ ला गेलो. दवाखान्यात अंदाजे १ तास थांबलो. त्यानंतर पोलीस स्टेशनला ९.०० वाजण्याच्या दरम्यान आलो. तेथे १ तास थांबलो. फिर्याद देतेवेळी मी, पती व मुलगा होता. घटनेबाबत आमच्यामध्ये चर्चा झाली नाही. अमान्य की, घटना घडली नाही. अमान्य की, आरोपींनी केलेल्या केसला शह देण्यासाठी खोटी केस केली.

०९. मी पोलीसांना जबाब देतांना, माझ्या पतीने आरोपी क्र. १ यास का मारले असे विचारले हा मजकुर फिर्याद देतेवेळी पोलीसांना सांगितले होते. परंतु हा मजकुर माझ्या जबाबात का नमुद नाही याचे कारण सांगता येत नाही. माझे पोलीसांशी शत्रुत्व नाही. हे म्हणणे खरे आहे की, पाटाचे पैसे आरोपींना देण्याची आमची इच्छा नाही. अमान्य की, त्यामुळे आरोपीसोबत विनाकारण भांडणे करतो. हे म्हणणे खरे आहे की, सासरे आप्पासाहेब औरंगाबादला ०१/१२/२०२३ रोजी तारीखेसाठी गेले होते. आरोपी क्र. १ ची चारचाकी गाडी आहे. माझे पती आरोपी क्र. १ यास माझ्या वडीलांना तुझ्या सोबत घेऊन जाऊ नको असे म्हणाले तरी देखील आरोपी क्र. १ ने सासरे आप्पासाहेब यांना बळजरीने त्यांच्या गाडीत नेले. अमान्य की, पुर्वीच्या रागातुन खोटी केस केली. अमान्य की, सरतपासात नमुद घटना खोटी सांगितली. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दि.०५.०२.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.02.06 11:15:02 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी,

न्यायालय क्रं.३ आष्टी

नि. फौ.ख.क्रं. २३०/२०२४
शासन वि. राजेंद्र
नि.क्र. ६१/क

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०२ यांची शपथेवर जबानी</u>**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | तुषार बाळासाहेब मदने |
| वय | : | २२ वर्षे |
| व्यवसाय | : | शेती |
| राहणार | : | शिराळ, ता. आष्टी जि. बीड |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. व्ही.एम. दारुणकर यांचेमार्फत</u>**

१. फिर्यादी माझी आई आहे. घटना दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास घरासमोर असतांना घडली. आरोपी क्र. १ व २ माझ्या आईला जुन्या वादाच्या कारणावरुन शिवीगाळ करत होते. माझे वडील बाळासाहेब आरोपींना शिवीगाळ का करता असे म्हणाले असता, आरोपी क्र. १ ने आईच्या गालावर दगड फेकुन मारला. त्यामुळे आईच्या उजव्या गालावर जखम झाली. त्यानंतर आईने आरडाओरडा केला. मी व वडीलांनी भांडणे सोडवली. आरोपी क्र. १ ने माझ्या उजव्या डोळ्याच्या वरती दगड फेकुन मारला. त्यामुळे मला उजव्या डोळ्याच्या वर जखम झाली. त्यानंतर इतर आरोपी क्र. ३ ते ६ तेथे आले व त्यांनी मला, वडीलांना व आईला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. वस्तीवरील लोकांनी भांडणे सोडवली. त्यानंतर कडा पोलीस स्टेशनला गेलो, पोलीसांनी दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिले. पत्र दिल्यानंतर कडा सरकारी दवाखाना येथे गेलो व उपचार घेतले. परत पोलीस स्टेशन येथे येऊन आईने आरोपीविरुध्द फिर्याद **नि.पी-५९/पीडब्ल्यु-१** दिली. दि. १०/१२/२०२३ रोजी पोलीसांनी घटनेबाबत जबाब नोंदवला.

०२. मला आरोपींनी ज्या दगडाने मारले ते पाहिल्यास मी ओळखु शकतो. साक्षीदारास जी.एम.पी. नंबर ३२/२०२५ वरील मुद्येमाल ओबड-धोबड दगड दाखवण्यात आला. मुद्देमाल ५०० ग्राम आहे. साक्षीदाराने मुद्येमाल तोच असल्याचे ओळखले. दगडास अनुक्रमे **एम.ओ. १** देण्यात आला आहे. आरोपीस पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपी क्र. १ ते ३, ५ व ६ न्यायालयात हजर आहेत. **नि. ६०** वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र. ४ आरोपी यांची ओळख न नाकारण्याच्या अटीसह हजेरीमाफी मंजुर.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही.एच. शेकडे यांच्यातर्फे उलटतपास सुरु.**

०३. मी अभियांत्रिकीचे शिक्षण नगर येथे घेत आहे. सन-२०२३ मध्ये मी पहिल्या वर्षात होतो. आरोपी आमच्या शेजारी राहतात. आरोपीसोबत आमचे १.५ वर्षापासुन वाद आहेत.

आरोपीसोबत वादाचे कारण सांगता येत नाही. मला पाटासाठी जमीन संपादित झालेबाबत माहिती नाही. दि. ०१/१२/२०२३ रोजी मी गावात होतो. त्या दिवशी आजोबा आप्पासाहेब मदने औरंगाबादला आरोपी क्र. १ च्या गाडीत गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते आरोपी क्र.१ सोबत गेल्याचे माझ्या वडीलांना पटले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजोबा पाटाच्या पैशासाठी औरंगाबादला गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्या घरामध्ये फक्त एक भिंत आहे. साक्षीदार चुलते संजय घरापासुन १०–१५ फुटावर राहतात. शिराळ ते मदनेवस्ती अंतर २ कि.मी. अंतर आहे व शिराळ ते कडा हे अंतर १२ कि.मी. आहे. घटनेच्यावेळी माझ्याकडे ह्या ८०१०१९६७६८ क्रमांकाचा मोबाईल होता. माझ्या जबाबात नमुद नंबर ८३२९६४०४०४ हा वडीलांचा आहे.

०४. दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ६.०० वाजता मी घरामध्ये टी.व्ही. पहात होतो. वडील शेतात काम करत होते. आजोबा मेंढ्या चारण्यासाठी गेले होते. चुलते संजय मदने हे कोठे होते हे सांगता येणार नाही. त्यांना घटनेबाबत ६.३० वाजण्याच्या सुमारास आवाज आल्यामुळे कळाले. घटना त्यांनी प्रत्यक्ष पाहिली व त्यांनी भांडणे सोडवली. घटनेच्या दिवशी ७.०० वाजता घरातुन कडा पोलीस स्टेशनला मी, आई व वडील निघालो. ७.३० ला पोलीस स्टेशनला आमच्या मालकीच्या दुचाकीने पोहचलो. पोलीस स्टेशनला ५ मिनीटे थांबलो. त्यांनी माझ्या नावे पत्र दिले. पोलीस स्टेशन ते कडा सरकारी दवाखाना ५ मिनीटाच्या अंतरावर आहे. दवाखान्यात ७.४० वाजण्याच्या सुमारास गेलो. ८.३० वाजण्याच्या सुमारास पुन्हा पोलीस स्टेशनला आलो. पोलीस स्टेशनला ११.०० वाजेपर्यंत होतो. त्यानंतर घरी गेलो. अमान्य की, दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ७.०० वाजण्याच्या सुमारास माझे आई वडीलांनी आरोपी क्र. १ व २ यांना शिवीगाळ केली. अमान्य की, आरोपी क्र. १ माझ्या आई वडीलांना शिवीगाळ करु नको असे म्हणाल्यामुळे राग आला. अमान्य की, त्यामुळे माझ्या वडील बाळासाहेब यांनी आरोपी क्र.१ ला दगड मारला व त्यामुळे त्यास जखम झाली. अमान्य की, आईने आरोपी क्र. २ वंदना हिच्या डोक्यात दगड मारल्याने जखम झाली. अमान्य की, मी लोखंडी फावड्याने आरोपींना मारले. अमान्य की, संजय, आप्पा व चंदुबाई यांनी लाथाबुक्क्यांनी आरोपींना मारहाण केली, शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आरोपी क्र. २ हिने आमच्या विरुध्द तक्रार दिली व खटला प्रलंबित आहे. घटनेनंतर मी १२/०३/२०२३ पर्यंत शिराळ येथे होतो. पोलीस घटनेच्या दुसऱ्या दिवशी घरी एकदाच आले.

०५. अमान्य की, आरोपींना मारहाण करुन पोलीस स्टेशनला मोटारसायकलने जात असतांना आम्ही पडलो व आम्हाला जखम झाली. अमान्य की, आरोपींनी मारहाण केल्यामुळे जखम झाली नाही. अमान्य की, पोलीसांनी दवाखान्यात जाण्यासाठी मला वैयक्तिक पत्र दिले

नाही. पोलीसांना जबाब देतांना, माझे वडील बाळासाहेब आरोपींना शिवीगाळ का करता असे म्हणाले असता, मी व वडीलांनी भांडणे सोडवली, हा मजकुर पोलीसांना सांगितला होता. परंतु पोलीसांनी तो मजकुर माझ्या जबाबात का नमुद केला नाही याचे कारण सांगता येत नाही. पोलीसांसोबत आमचे वाद नाही. अमान्य की, आरोपींविरुध्द खोटी केस केली. अमान्य की, सरतपासातील मजकुर खोटा नोंदवला आहे. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दि.०५.०२.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.02.06 11:15:14 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी,

न्यायालय क्रं.३ आष्टी

नि. फौ.ख.क्रं. २३०/२०२४
शासन वि. राजेंद्र
नि.क्र. ६२/क

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०३ यांची शपथेवर जबानी**

नाव : बाळासाहेब आप्पा मदने

वय : ४५ वर्षे

व्यवसाय : शेती

राहणार : शिराळ, ता. आष्टी जि. बीड

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. व्ही.एम. दारुणकर यांचेमार्फत**

१. फिर्यादी माझी पत्नी आहे. दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास आरोपी क्र. १ ते ४ जुन्या वादाच्या कारणावरुन शिवीगाळ करत होते. मी आरोपींना शिवीगाळ का करता असे सांगायला गेलो असता, आरोपी क्र. १ ते ६ यांनी शिवीगाळ केली व मारहाण केली. फिर्यादी रुपाली हिला आरोपी क्र. १ ने गालावर दगड मारला. मुलगा तुषार ह्याच्या डोळ्याच्या वरती दगड लागला. त्यानंतर आम्ही कडा येथे पोलीस स्टेशनला गेलो. त्यानंतर कडा पोलीस स्टेशनला गेलो, पोलीसांनी दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिले. सरकारी दवाखाना येथे गेलो व उपचार घेतले. परत पोलीस स्टेशन येथे येऊन पत्नी रुपालीने आरोपीविरुध्द फिर्याद **नि.पी-५९/पीडब्ल्यु-१** प्रमाणे दिली. दि. १०/१२/२०२३ रोजी पोलीस घटनास्थळी आले, पंचनामा केला. मी त्यांना मारलेला दगड दाखवला. पोलीसांनी घटनेबाबत माहिती घेतली.

०२. आम्हाला आरोपींनी ज्या दगडाने मारले ते पाहिल्यास मी ओळखु शकतो. साक्षीदारास जी.एम.पी. नंबर ३२/२०२५ दाखवण्यात आला. दगड अर्धा किलोचा आहे. साक्षीदाराने मुद्देमाल तोच असल्याचे ओळखले. दगडास **एम.ओ. १** देण्यात आला आहे. आरोपीस पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपी क्र. १ ते ३, ५ व ६ न्यायालयात हजर आहेत. **नि. ६०** वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र. ४ आरोपी यांची ओळख न नाकारण्याच्या अटीसह हजेरीमाफी मंजुर.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. व्ही.एच. शेकडे यांच्यातर्फे उलटतपास सुरु.**

०३. माझे पदवी पर्यंत शिक्षण झाले आहे. मला लिहता वाचता येते. माझे वडील आप्पासाहेब यांना सोनाजी, रावसाहेब व आरोपी क्र. ३ पन्नालाल हे भाऊ आहेत. मी व संजय मदने सख्खे भाऊ आहोत. वडीलांनी व त्यांच्या भावांनी शहाजी आजबे यांच्याकडुन जमीन विकत घेतलेबाबत माहिती नाही. अमान्य की, आमच्या जमीनीतुन चोभा निमगाव येथील पाट गेलेला आहे. अमान्य की, माझे वडील आप्पा तसेच गावातील इतर लोक पाटामध्ये गेलेल्या जमीनीचे पैसे केससाठी औरंगाबादला जातात. अमान्य की, दि. ०१/१२/२०२३ रोजी वडील आप्पा आरोपी क्र. १ च्या गाडीमध्ये केस साठी औरंगाबादला गेले. अमान्य की, त्यामुळे मला आरोपींचा राग

आला. आरोपीसोबत आमचे १६ वर्षापासुन वाद आहेत. आमच्या वादाचे कारण की, आरोपींनी सामाईक विहीरीवरील पाईप कापले, मोटार काढुन आणली. तसेच बोअरमधील मोटार काढली व दगड टाकले.

०४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्या जमीनीचे वाटप झाले असुन आम्ही स्वतंत्र खातो. अमान्य की, पाटाखाली गेलेल्या जमीनीमध्ये आरोपींचा हिस्सा आहे. घटनेच्या दिवशी मी आमच्या शेडमध्ये म्हशी बांधत होतो. मुलगा तुषार घटनेच्या आदल्या दिवशी आला व तो एक दिवस राहुन परत गेला. घटनेनंतर पुन्हा तुषार २ महिन्यांनी आला. कड्याला स्वतः मोटारसायकलवर मी, पत्नी व मुलगा तुषार गेलो. अमान्य की, मोटारसायकलने जात असतांना पडलो व जखमी झालो. अमान्य की, दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ७.०० वाजता मी व फिर्यादी यांनी आरोपीच्या घरासमोर जाऊन त्यांना शिवीगाळ केली. मी आरोपी क्र. १ राजेंद्र व माझी पत्नी रुपाली हिने आरोपी क्र. २ वंदनाच्या डोक्यात दगड मारलेबाबत माहिती नाही. मुलगा तुषार ने आरोपींना फावड्याने मारल्याबाबत माहिती नाही. संजय, आप्पा व चंदुबाई यांनी आरोपी क्र. १ राजेंद्र ला शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिलेबाबत माहिती नाही. त्यामुळे आरोपींनी आमच्यावर केस केलेबाबत माहिती नाही.

०५. पोलीसांना जबाब देतांना मी, आरोपी क्र. १ ते ४ जुन्या वादाच्या कारणावरुन शिवीगाळ करत होते, हे सांगितले होते परंतु तसा मजकुर माझ्या जबाबात का नमुद नाही याचे कारण सांगता येत नाही. अमान्य की, आरोपीविरुध्द खोटी केस नोंदवली. अमान्य की, आरोपींनी केलेल्या केसला शह देण्यासाठी व जुन्या वादातुन आरोपीविरुध्द खोटी केस केली. अमान्य की, आरोपींच्या मारण्यामुळे जखमा झाल्या नाही. अमान्य की, सरतपासात नमुद मजकुर खोटा नोंदवला आहे. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दि.०५.०२.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.02.06 11:15:21 +0530

श्री. एम. आर.बडाख

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी,

न्यायालय क्रं.३ आष्टी